जिल्हा परिषद अमरावती

मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय

कॅम्प रोड, अमरावती ४४४ ६०१

दूरध्वनी क्रमांक – २६६२९२६ ई मेल – ceozp.amravati@maharashtra.gov.in

वेबसाईट – www.zpamravati.gov.in


क्रमांक जिप/मुकाअ/स्विस / २०१ /१६, दिनांक :-२२ / ११ / २०१६

**प्रति,**

**------------------------------खातेप्रमुख (सर्व)**

**--------------------, जिल्हा परिषद, अमरावती**

**विषय :- कार्यालया करीता खरेदी समिती स्थापन करणे बाबत.**

संदर्भीय शासन आदेशाद्वारे महाराष्ट्र उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग यांनी शासकीय विभागांना करावयाच्याकार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपद्धतीची नियमपुस्तीकेद्वारे खरेदीसाठी च्या सुचना दिलेल्या आहेत. सदर शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक २.९.३ ब) जिल्हास्तरीय खरेदी समितीची रचना नमुद केलेली आहे. आपल्या विभागा करीता खालीलप्रमाणे राहील.

**जिल्हा स्तरीय खरेदी समिती**

| | | |
|---|---|---|
| १ | संबंधित खरेदीदार विभागाचा जिल्हा कार्यालय प्रमुख | अध्यक्ष |
| २ | महाव्यवस्थापक(जिल्हा उदयोग केंद्र)/प्रतिनिधी | सदस्य |
| ३ | लेखा व कोषागारे या कार्यालयाचा गट-अ/गट-ब दर्जाचा अधिकारी/प्रतिनिधी | सदस्य |
| ४ | संबंधित खरेदीदार विभागाचा खरेदी अधिकारी | सदस्य सचिव |

उपरोक्त रचनेनुसार जिल्हा स्तरीय खरेदी समितीचा अध्यक्ष हे संबंधित खातेप्रमुख , कार्यालय प्रमुख असतील. सदर खरेदी समितीचे सदस्य सचिव म्हणुन संबंधित विभागांनी त्यांच्या खात्यातील किमान गट-ब पेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकाऱ्याची नियुक्ती करावयाची आहे. ज्या विभागाकडे गट ब चे अधिकारी नसतात त्यांनी याबाबत वित्त विभाग जि.प.चा सल्ला घ्यावा. तसेच महाव्यवस्थापक (जिल्हा उदयोगकेंद्र) प्रतिनिधी व लेखा व कोषागार या कार्यालयाचा प्रतिनिधी अनुक्रमे जिल्हा उदयोग केंद्र व वित्त विभाग, जिल्हा परिषद, अमरावती यांच्या कडुन नावे प्राप्त करुन घ्यावेत तसेच ज्या खरेदीची वेळी तांत्रिक मार्गदर्शन किंवा सल्ला आवश्यक आहे,अशा खरेदीचे वेळी संबंधित विषयाचे तज्ञ सल्लागार म्हणुन यांना विशेष निर्यंत्रित सदस्य म्हणुन घ्यावे.

वरील प्रमाणे खरेदी समितीची रचना करुन त्याद्वारे खरेदी प्रक्रीया वेळोवेळी राबवावी.

**(डॉ.किरण कुलकर्णी, भा.प्र.से)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, अमरावती**

**प्रत :-**

**१. अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.अमरावती यांना कार्यवाहीस्तव अग्रेषित.**

**२.महाव्यवस्थापक , जिल्हा उदयोग केंद्र, अमरावती यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव .**

**३.उप-मुख्य कार्यकारी अधिकारी(सामान्य), जिल्हा परिषद, अमरावती यांनी सुचित केल्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.**

**४.मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी सुचित केल्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.**